N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** सिरसाळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0224 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/12/2022 00:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 08/12/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/12/2022
**Time From (वेळेपासून):** 14:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/12/2022 **Time (वेळ):** 23:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/12/2022 23:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सिरसाळा,परळी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सिमींता संदीपान तिडके
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 30
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भोगलवाडी,धारुर,धारूर ,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भोगलवाडी,धारुर,धारूर ,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाळ दशरथ शेळके | | | 1. सिरसाळा,परळी,सिरसाळा,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपय दराच्या 20 नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय, बीड
दिनांक 08/12/2022

मी सिमिंता भ्र.संदीपान तिडके, वय-30 वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.भोगलवाडी ता.धारुर जि.बीड मो.क्र. 7028606133, 8600453022.
मी दिनांक 05/12/2022 रोजी श्री.रविंद्र परदेशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष सिरसाळा येथील खामगाव शिवारात सुरक्षीत ठिकाणी तक्रार दिली की, " श्री.वचिष्ट श्रीराम कुटे रा.वाकी ता. परळी जि.बीड यांचे फिर्यादवरुन माझे व माझा भाऊ गोविंद आत्माराम मुंडे याचे विरुध्द पोलीस ठाणे सिरसाळा येथे गु.र.नं.128/2022 कलम 384, 388, 327, 507, 34 भा.द.वी.प्रमाणे दिनांक 20/07/2022 रोजी गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा तपास पीएसआय श्री.प्रकाश शेळके यांचेकडे होता. माझा भाऊ श्री.गोविंद मुंडे याची दिनांक 25/11/2022 रोजी अटकपुर्व जामीन झाली. दिनांक 04/12/2022 रोजी पीएसआय श्री.शेळके यांनी माझा भाऊ गोविंद मुंडे याला फोन करुन दिनांक 05/12/2022 रोजी पोलीस ठाणे सिरसाळा येथे हजर राहण्याचे सांगुन मला सोबत घेऊन येण्याचे सांगीतले तसेच दाखल गुन्ह्याचे तपासामध्ये मदत करण्यासाठी व माझा भाऊ गोविंद आत्माराम मुंडे याचे अटकपुर्व जामीनास सहकार्य केल्याचा मोबदला म्हणुन 25000/-रुपये द्यावे लागतील असे सांगीतले." वगैरे मजकुराची तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 05/12/2022 रोजी पीएसआय श्री.प्रकाश शेळके हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व व पंच क्रमांक-1 श्री.क्षीरसागर यांना पोलीस ठाणे सिरसाळा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/परदेशी यांनी मला व पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि/परदेशी यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझेकडे देऊन मला व पंच क्र.1 श्री.क्षीरसागर यांना पीएसआय श्री.शेळके यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे सिरसाळा येथे खाजगी वाहनाने पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता, पोलीस ठाणे सिरसाळा येथे माझी व पीएसआय श्री. शेळके यांची भेट झाली. त्याठिकाणी माझा भाऊ गोविंद मुंडे व वडील श्री.आत्माराम मुंडे हजर होते. पीएसआय शेळके यांनी माझा भाऊ श्री.गोविंद मुंडे यांचा फॉर्म भरुन घेतला. त्यानंतर माझी, माझा भाऊ, माझे वडील व पीएसआय श्री.शेळके यांचेत दाखल गुन्ह्या संदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्री.शेळके यांनी आमचे विरुध्द दाखल गुन्ह्याचे तपासामध्ये मदत करण्यासाठी तसेच माझा भाऊ गोविंद आत्माराम मुंडे याचे अटकपुर्व जामीनास सहकार्य केल्याचा मोबदला म्हणुन 25000/रु. मागणी करुन लाच रक्कम तात्काळ स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. लाचेच्या सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम माझेकडे उपलब्ध नसल्याने मी लाचेच्या सापळ्याचे आयोजन दिनांक 08/12/2022 रोजी करावे तो पर्यंत मी पैशाची व्यवस्था करते अशी विनंती केल्याने सदरची सापळा कारवाई स्थगित करुन दिनांक 08/12/2022 रोजी पीएसआय श्री.शेळके यांचे विरुध्द सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा दिनांक 05/12/2022 रोजी केला.
दिनांक 07/12/2022 रोजी मी पोनि/परदेशी यांना संपर्क करुन लाच रक्कम उपलब्ध झाल्याचे कळवुन पुढील कारवाई करणे बाबत विनंती केली होती. त्यावरुन दिनांक 08/12/2022 रोजी पोनि/परदेशी हे पंच व स्टाफसह सिरसाळा येथील खामगाव शिवार येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आले. पोनि/परदेशी यांनी पीएसआय श्री.शेळके यांचेविरुद्ध सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले व कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक, पंच व मला सुचना दिल्या. पीएसआय श्री.शेळके यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांना दिसेल अशा दर्शनी ठिकाणी येवुन

माझेजवळील स्कार्प तोंडास बांधावा असा ईशारा नेमुन देऊन लाच रक्कम माझेकडील पर्सचे कप्प्यात ठेवली. वगैरे बाबींचा सविस्तर सापळापुर्व कारवाईचा पंचनामा दिनांक 08/12/2022 रोजी केला.

सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर पोनि/परदेशी यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री.क्षीरसागर यांना पीएसआय श्री.शेळके यांची भेट घेऊन लाच रक्कम देण्यासाठी पोलीस ठाणे सिरसाळा येथे बसने रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 श्री.टाक हे येत होते. मी व पंच क्र.1 श्री.क्षीरसागर असे बसने सिरसाळा येथील चौकात उतरुन पायी पोलीस ठाणे सिरसाळा येथे गेलो. त्याठिकाणी पीएसआय शेळके यांची भेट झाली नाही. त्यानंतर मी तेथील पोलीस अंमलदार यांना पीएसआय श्री.शेळके यांना फोन करण्यास सांगीतला असता, त्यांनी पीएसआय श्री.शेळके यांना फोन केला त्यावेळी पीएसआय श्री.शेळके यांनी येतो असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने पीएसआय श्री.शेळके पोलीस ठाणे सिरसाळा येथे आले. त्याठिकाणी माझी व श्री.शेळके यांची भेट झाली. भेटी दरम्यान माझी व पीएसआय शेळके यांचेत गुन्ह्याबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान पीएसआय श्री. शेळके यांनी मला " तुझा फोन चालुय का ? असे म्हणुन माझेकडील मोबाईल फोन चेक केला. त्यानंतर पीएसआय श्री.शेळके यांनी माझेकडील 25000/-रु. पैकी त्याचेतले काही दि मला हायकोर्टात ते गेलेलो, मला दहा दे बाकीचे तुच ठेव असे सांगीतले. त्यावर मी श्री.शेळके यांना दहा देऊ फक्त असे म्हणाले त्यावेळी श्री.शेळके यांनी हो, साहेबांना नाही देत, साहेब म्हणाले त्यांना सहकार्य करा, असे म्हणुन माझेकडे पैशाची मागणी केली असता, मी माझेकडील पर्समधील लाच रक्कम 25000/-रु. उजवे हाताने बाहेर काढुन दोन्ही हातांनी मोजुन त्यामधील 10000/-रुपये लाच रक्कम श्री.शेळके यांचेसमोर धरले असता त्यांनी सदरची 10,000/रु. लाच रक्कम ही उजवे हाताने स्वीकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांचेकडील पॉकेटमध्ये ठेवुन सदरचे पॉकेट त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पँटच्या समोरच्या डावे बाजुच्या खिशात ठेवले. उर्वरित 15000/-रुपये मी माझेकडील पर्सचे कप्प्यात ठेवले. त्यानंतर मला लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा मी 14.25 वा. केला. त्यादरम्यान पीएसआय श्री.शेळके हे त्यांचेकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे सिरसाळा येथुन निघुन गेले. पोनि/परदेशी हे पंच क्रमांक-2 व सापळा पथकासह पोलीस ठाणे सिरसाळा येथे आले. पोनि/परदेशी यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर लागलीच श्री.शेळके यांचे पाठोपाठ मी, सापळा पथकातील सदस्य, पंच क्रमांक 1 श्री.क्षीरसागर व पंच क्र-2 श्री.टाक असे खाजगी वाहनाने रवाना झालो. पीएसआय श्री.शेळके हे सुयज्ञानगर सिरसाळा येथे जाऊन त्यांचेकडील मोटार सायकल उभी करुन त्यांचे घरामध्ये गेले. त्यावेळी आम्ही त्यांचेपाठोपाठ त्यांचे घरामध्ये गेलो. पोनि/परदेशी यांनी श्री.शेळके यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/परदेशी यांनी पंच क्र.1 श्री.क्षीरसागर यांना पंच क्र.2 श्री.टाक यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.क्षीरसागर यांनी सांगितले की, "तक्रारदार यांना श्री.शेळके यांनी 25000/-रु.पैकी 10000/-रुपयाची मागणी करुन 10,000/-रु. लाच रक्कम स्वत: स्विकारुन दोन्ही हातानी मोजुन त्यांचेकडील पॉकेटमध्ये ठेवुन सदरील पॉकेट हे त्यांनी परिधान केलेल्या पँटचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवले आहे" असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला.

पोनि/परदेशी यांनी पीएसआय श्री.शेळके यांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव प्रकाश दशरथ शेळके, वय-41 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पोलीस उप निरीक्षक, पोलीस ठाणे सिरसाळा रा.चांडोळ ता.जि.बुलढाणा ह.मु. नंदकुमार रामराव गडदे यांचे घर, सुयज्ञानगर, सिरसाळा ता.परळी जि.बीड (वर्ग-2) असे सांगीतले. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी श्री.शेळके यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता, श्री.शेळके यांनी त्यांचे अंगावर परिधान केलेल्या पँटचे समोरील डावे बाजुचे खिशातुन पॉकेट बाहेर काढुन पॉकेटमधील 10000/रु. लाच रक्कम बाहेर काढुन पोनि/परदेशी यांचे समोर धरली असता, पोनि/परदेशी यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री.टाक यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्रमांक 2 यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/परदेशी यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतल्या. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी मला उर्वरीत 15,000/-रु. लाच रकमेबाबत विचारणा केली त्यावेळी मी माझेकडील पर्समधील उर्वरित 15,000/-रु. लाच रक्कम पोनि/परदेशी यांचेसमोर धरली त्यावेळी पोनि/परदेशी यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री.टाक यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्रमांक 2 श्री.टाक यांनी उर्वरित लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/परदेशी यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे करण्यात येईल असे सांगुन मला ला.प्र.वि. कार्यालय, बीड येथे हजर राहणेबाबत कळवलेवरुन मी बसने ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे हजर आले.त्याबाबत दिनांक 08/12/2022 रोजी सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला.

तरी श्री.प्रकाश दशरथ शेळके, वय-41 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पोलीस उप निरीक्षक, पोलीस ठाणे सिरसाळा रा. चांडोळ ता.जि.बुलढाणा ह.मु.नंदकुमार रामराव गडदे यांचे घर, सुयज्ञानगर, सिरसाळा ता.परळी जि.बीड (वर्ग-2) यांनी दिनांक 05/12/2022 रोजी माझेकडे आमचे विरुध्द दाखल गुन्ह्याचे तपासामध्ये मदत करण्यासाठी तसेच माझा भाऊ गोविंद आत्माराम मुंडे याचे अटकपुर्व जामीनास सहकार्य केल्याचा मोबदला म्हणुन 25000/रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 08/12/2022 रोजी 14.25 वा.चे सुमारास पोलीस ठाणे सिरसाळा येथे लाचरक्कम 25000/-रुपयांपैकी 10000/-रु. पंचासमक्ष स्वत: स्विकारले असता, श्री.शेळके यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले म्हणुन माझी श्री.प्रकाश शेळके यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काडल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर खरी आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pardip babu ekshinge(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

स्मिता

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.सिरसाळा

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** pardip babu ekshing
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**